महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३-अ/सेप्रनि/श्वान पथक/११६/२०११

मुंबई, दि. 22 /१०/२०२६

**संदर्भ** :- या कार्यालयाचे समक्रमांकित, दि. १८/०७/२०२३ चे परिपत्रक.

**विषय** :- पोलीस दलाच्या श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, पोलीस हवालदार (श्वान पथक) (सेवाप्रवेश) नियम, २०२३ च्या नियम क्र ५(२) मधील सुधारणाबाबत

******

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग चार-ब, क्र. डीजीओ-०८१६/प्र.क्र. ३०१/पोल-४, दि.३०/०६/२०२३ अन्वये पोलीस दलाच्या श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, गट -अ (राजपत्रित), पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट -ब (अराजपत्रित), पोलीस हवालदार (श्वान पथक), गट - क (सेवाप्रवेश) नियम, २०२३ मंजुर करण्यात आले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमामधील नियम क्र. ५ (२) मध्ये महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग चार-ब, क्र. डीजीओ-०८२६/प्र.क्र. ३०४/पोल-४, दि.११/०९/२०२६ अन्वये शुध्दीपत्रक निर्गमित केले आहे. सदर शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या mahaonline.gov.in या संकेतस्थळावर view gazettes या शिर्षाखाली उपलब्ध आहे.

२. तरी, खालील घटक प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, पोलीस दलाच्या श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, पोलीस हवालदार (श्वान पथक), (सेवाप्रवेश) नियम, २०२३ मधील नियम क्र. ५ (२) मध्ये शासनाने केलेल्या सुधारणानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(सुप्रिया पाटील यादव)
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह)

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२/- पोलीस उप अधीक्षक यांना विनंती करण्यात येते की, सदरहू दि.११/०९/२०२६ च्या शासन राजपत्राची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर पोलीस दलाच्या श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, गट -अ (राजपत्रित), पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट -ब (अराजपत्रित), पोलीस हवालदार (श्वान पथक), गट - क (सेवाप्रवेश) नियम, २०२३ या विषयाखाली कायमस्वरुपी उपलब्ध करुन देण्यात यावी.

कार्यासन अधिकारी, का.क्र. १४-अ / ३६

E:सेवाप्रवेश नियम नस्ती\116.2011 Dog Squad RR.docx

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १२२] शुक्रवार, सप्टेंबर ११, २०२६/भाद्रपद २०, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५२३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ सप्टेंबर २०२६.

**शुद्धिपत्रक**

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक डीजीओ-०८२६/प्र.क्र.३०४/पोल-०४.—महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम ५ (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या अंतर्गत असलेल्या पोलीस दलाच्या श्वान पथकातील पोलीस निरीक्षक व वरिष्ठ श्वान शिक्षक, गट-अ (राजपत्रित), पोलीस उप निरीक्षक व श्वान शिक्षक, गट- ब (अराजपत्रित), पोलीस हवालदार (श्वान पथक), गट-क या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करण्यात येत आहेत. याबाबत दिनांक २८ जून २०२३ रोजी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

या आदेशामधील नियम क्र. ५ मधील (२) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे—

" श्वान पथकातील पोलीस हवालदार (श्वान पथक), गट-क या पदावरील नियुक्ती, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे येथे आयोजित केलेले मूलभूत प्रशिक्षण (बॉम्बशोधक व अंमलीद्रव्ये यामधील सहा महिन्यांचे आणि भारतीय दंड संहिता गुन्हे शोधाबाबतचे नऊ महिन्यांचे) यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर करण्यात येईल ".

या ऐवजी नियम क्र. ५ मधील (२) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे—

" श्वान पथकातील पोलीस हवालदार, श्वान पथक गट-क या पदावरील नियुक्ती ही गुन्हे अन्वेषण विभाग पुणे येथील श्वान प्रशिक्षण केंद्र येथे किंवा केंद्र शासन अथवा इतर राज्यातील शासकीय श्वान प्रशिक्षण केंद्र येथे आयोजित केलेले मूलभूत प्रशिक्षण (बॉम्ब शोधक किंवा अंमलीद्रव्ये यासाठी विहित असलेले एक सहा महिन्याचे प्रशिक्षण किंवा भारतीय दंड संहिता गुन्हे शोध बाबतचे नऊ महिन्यांचे या तिन्ही पैकी कोणतेही एक प्रशिक्षण) यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर करण्यात येईल."

ही सुधारणा सेवा प्रवेश नियमाचे मूळ आदेश क्र.डिजीओ-०८१६/प्र.क्र.३०१/पोल-४, दिनांक २८ जून २०२३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अर्चना वालझाडे,**
शासनाच्या उप सचिव.

**HOME DEPARTMENT**

Mantralaya (Main Building), 2nd Floor, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated 11th September 2026.

*CORRIGENDUM*

MAHARASHTRA POLICE ACT.

No. DGO-0826/C.R.304/Pol-04.—In exercise of the powers conferred by Section 5(b) of the Maharashtra Police Act (Act XXII of 1951), and all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules regulating recruitment to the posts of Police Inspector and Senior Dog Handler, Group-A (Gazetted); Police Sub-Inspector and Dog Handler, Group-B (Non-Gazetted); and Police Head Constable (Dog Squad), Group-C in the Dog Squad of the Police Force under the Home Department of the Government of Maharashtra. Orders in this regard were issued on 28th June 2023.

In Rule No. 5 (2) of the said rules, the existing provision reads as follows :

" Appointment to the post of Police Head Constable (Dog Squad), Group-C shall be made after successful completion of basic training organized at the Crime Investigation Department, Pune comprising six months in bomb detection and narcotics, and nine months in Indian Penal Code crime investigation. "

In place of the above, Rule No. 5 (2) is amended as follows :

" Appointment to the post of Police Head Constable, Dog Squad, Group-C shall be made after successfully completion of any one of the prescribed three training programs: Prescribed six-month basic training organized at the Dog Training Centre, Crime Investigation Department, Pune or at a Government Dog Training Centre of the Central Government or other States (for bomb detection or narcotics); OR nine months of training of crime investigation as prescribed in Indian Penal Code."

This amendment shall come into force retrospectively from the date of the original recruitment rules order No. DGO-0816/C.R.301/Pol-04, dated 28th June 2023.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ARCHANA WALZADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.